मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे ऐवजी उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे या पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०१९/प्र.क्र.६०/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ६ जुलै, २०१९

संदर्भ :- १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-मकोनि-१०००/प्र.क्र.४४/०५,कोषा-प्र.५ दि. ०४.०१.२००६.
२) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र.एएफओ-२०१९/प्र.क्र.०४/फ-७, दि.२८.०५.२०१९.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.१९ (१८-१९)/१२३/२०१९-२०, दि.१९.०६.२०१९

प्रस्तावना -

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्यांची देयके फेब्रुवारी-२००६ पासून इतर विभागाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच कोषागारातून पारित करण्याबाबत वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०४.०१.२००६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १३ नुसार व नियम १५(३) नुसार विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची यादी महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येते. यानुसार वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार विभागातील आहरण व संवितरण आधिकाऱ्यांच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे ऐवजी उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे या पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदरहू पदनामास "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे हे पद आस्थागित ठेवून उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे हे पद तात्पुरत्या स्वरुपात संवर्गात जोडलेले आहे. त्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाने संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन पदनामात बदल करुन **मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे ऐवजी उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे** या पदास पुर्वीपासून असलेला आहरण व संवितरण सांकेतांक क्रमांक (२२०१-००११०८) व कोषागार सांकेतांक क्र.२२०१ आहे तोच ठेवून वित्त विभागाच्या दि.०४.०१.२००६ रोजीच्या शासन निर्णयानूसार त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कर्मचाऱ्यांची

वेतन व भत्याची देयके पारीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे

अ. क्र.	**वनवृत्त कार्यालय**	**आहरण व संवितरण अधिकारी घोषित करावयाचे पदनाम**	**मुख्यालय ठिकाण**	**जवळचे उपकोषागार कार्यालय व सांकेतांक क्र.**	**आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्र**
१	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई	उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे	पुणे	पुणे २२०१	२२०१-००११०८

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१९०७०६१५१६५३१५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec,
serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.07.06 15:25:16 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति -

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई.
५. उप वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १५ (२) व १५ (३) नुसार उपरोक्त अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याची पुढील कार्यवाही करण्यात करावी.)
७. संचालक, लेखा व कोषागार, संचालनालय, मुंबई.
८.वरीष्ठ लेखा कोषागार अधिकारी, नागपूर / मुंबई.
९.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०.सहसंचालक, (तांत्रिक) लेखा व कोषागार, मुंबई.
११. वित्त विभाग, कार्यासन कोषा. प्र-५, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (फ-२), महसूल व वन विभाग.